# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड डी.सी.आर. दिनांक ०२/०४/२०१८**

## १) जिवे मारण्याचा प्रयत्न :-

**अ) देगलुर :-** दिनांक ०१.०४.२०१८ रोजीचे १०.३० वा. चे सुमारास दुर्गाबार देगलुर नांदेड यथे, यातील नमुद आरोपीतांनी गैर कायदयाची मंडळी जमवुन हातामध्ये तलवार, लोखंडी रॉड, करवत, लोखंडी कत्या, पाईप असे हत्यार वापरुन शिवकांत टेकाळे यास डोक्यात तलवारीने मारुन गंभीर जखमी करुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला. बिना परवाना हत्यार वापरुन अर्मस ॲक्टचे उल्लंघन केले. वगैरे **फिर्यादी शिवकांत गोविंदराव टेकाळे व्यवसाय हॉटेल चालक रा. टेकाळे गल्ली ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पो. स्टे. देगलुर** गुरनं १२४/२०१८ कलम ३०७, १४३, १४८, १४९, ५०४,५०६, भादंवि व ४/२५ आर्मस ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल असून तपास **पोउपनि/ क्षिरसागर मो.नं. ०२४६३/२५५१००** हे करीत आहेत.

**ब)देगलुर :-** दिनांक ०१.०४.२०१८ रोजीचे १०.३० वा. चे सुमारास दुर्गाबार देगलुर नांदेड यथे, यातील नमुद आरोपीतांनी गैर कायदयाची मंडळी जमवुन हातामध्ये तलवार, लोखंडी रॉड, करवत, लोखंडी कत्या, पाईप असे हत्यार वापरुन फिर्यादी व साक्षीदार यास ठार मारण्याच्या उदेशाने फिर्यादीचा चुलता देविदास लच्छमन्ना कडलावार यास डोक्यात तलवारीने मारुन गंभीर जखमी करुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला. बिना परवाना हत्यार वापरुन अर्मस ॲक्टचे उल्लंघन केले. वगैरे **फिर्यादी किरण दिगांबर कडलावार वय २२ वर्षे व्यवसाय व्यापार रा. नगरेश्वरनगर देगांवरोड ता. देगलुर जि. नांदेड.** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पो. स्टे. देगलुर** गुरनं १२५/२०१८ कलम ३०७, १४३, १४८, १४९, ५०४,५०६, भादंवि व ४/२५ आर्मस ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल असून तपास **पोउपनि/ क्षिरसागर मो.नं. ०२४६३/२५५१००** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४.

**:: प्रेस नोट ::**

## " नांदेड शहरात  कुंटन खान्यावर" स्थानिक गुन्हे  शाखेची धाड

पोलीस अधिक्षक, श्री. चंद्रकिशोर मीणा यांनी नांदेड शहरातील वाढती गुन्हेगारी व चोरी-घरफोडी,वेश्या व्यवसाय यास आळा बसावा व प्रतिबंध व्हावा या उद्देशाने एलसीबीचे पोलीस निरीक्षक श्री संदीप गुरमे यांना गुन्हेगांर व गुन्हेगारी विरुध्द प्रतिबंधक कार्यवाही करुन गुन्हे उघडकीस आणणेबाबत तसेच शहरात वाढत्या वेश्या व्यवसायाचे समुळ उच्चाटन करण्याचे आदेश दिले होते.

सदर आदेशान्वये मा. पो.नि. स्थागुशा. श्री. संदीप गुरमे  यांना गुप्त बातमीदार यांचेकडुन खात्रीशीर माहिती मिळाली की, मोर चौक तिरुमल्ला नगर नांदेड येथील देवराव पावडे यांचे घरात कुंटनखाना चालु असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली  मा. पोलीस अधिक्षक श्री. चंद्रकिशोर मीणा , मा. अप्पर पोलीस अधिक्षक, श्री. मंगेश शिंदे  यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे पोनि. श्री. संदीप गुरमे, श्री. पी.डी.भारती,मसपोनि.प्रभा पुंडगे  पोह/माणिक हंबर्डे, पोना/राजु पांगरीकर, बालाजी मुंढे, पोशि/तानाजी येळगे, श्रीरामे,बोडके, रहेमान, जावेद, गंगुलवार, बयनवाड,  मपोशि/उज्वला दिग्रसे असे पथक तयार करुन दि.01/04/2018 रोजी 20.35 धाड टाकली असता सदर ठीकाणी कुंटणखाना चालविणारी मालकीन व दोन एजंट  आणि एक वेश्यागमन करण्यासाठी आलेला अश्या चार आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन भाग्यनगर नांदेड येथे मसपोनि.प्रभा पुंडगे  नेमणुक महीला सहाय्य कक्ष नांदेड यांचे तक्रारीवरुन गु.र.नं.82/2018 कलम 3,4,5,6 अनैतिक मानवी व्यपार प्रतिबंध अधिनियम 1956 व सहकलम 370(1)(2)(3),170 अ (2) भादंवि  प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.आरोपीताकडे नगदी ,मोबाईल व वेश्यागमनासाठीचे 25,830/- रु.चे साहीत्य मिळुन आले. तसेच दोन पीडीत महीला मिळुण आल्या त्यांना महीला सुधारगृहात पाठविण्यात आले.

(संदीप गुरमे)
पोलीस निरीक्षक,
स्थानिक गुन्हे शाखा,
नांदेड.

**प्रेस नोट**

**फरारी आरोपी बददल उदघोषणा**

दिनांक ०४/०२/२०१८ रोजी  दत्तनगर नांदेड येथे आरोपी नामे तुळजासिंह ऊर्फ मुन्ना कन्हैयासिंह ठाकुर (कौशिक) वय ४५ रा. दत्तनगर नांदेड याने पोलीस हेड कॉन्सटेबल शिवाजी पुंडलीकराव शिंदे नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा, नांदेड यांच्या डोक्यात दगड घालुन व धारधार शस्त्राने वार करुन निर्घुन खुन केला आहे. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथे गु.र.नं २७/१८ कलम ३०२ भादवि प्रमाणे गुन्हा दाखल होवुन सदर आरोपीचा पोलीस पथकांनी कसोशिने शोध घेतला परंतु सदर आरोपी मिळुन आला नाही. त्यामुळे सदर आरोपी विरुध्द कलम ८२ फौजदारी प्रक्रिया संहिता प्रमाणे कार्यवाही होणे करीता अहवाल पाठविला त्यावरुन उक्त आरोपी फरारी झाला आहे. किंवा तो उक्तपणे वावरत आहे. किंवा फरारी झाला आहे. याबददल विदयमान न्यायालयाची खात्री पटल्याने मा. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालय क्रमांक ०४ नांदेड येथे सकाळी १०.३० वाजता उपस्थित होण्यास फर्माविले आहे. फरारी उदघोषणा केली आहे.

**पोलीस अधीक्षक नांदेड,**
**करीता.**